## मराठी राजभाषा पर्वाचे पहिले पान

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषिकांचे एक चिरवांछित स्वप्न साकार झाले. महाराष्ट्र राज्य हे लोककल्याणकारी राज्य ठरावे, महाराष्ट्रात अंतर्भूत झालेल्या घटक प्रदेशांतील लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण व्हावी आणि महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधता यावा या दृष्टीने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिवशी शासनाने जी महत्त्वाची धोरणे जाहीर केली त्यांपैकी महाराष्ट्राच्या राज्यकारभाराची भाषा मराठी राहील हे एक होय.

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मराठीला राजभाषेची प्रतिष्ठा लाभणे क्रमप्राप्तच आहे. परकीय राजवटीचा अस्त झाल्यानंतरही राज्यकारभारातील इंग्रजी भाषेच्या वापरामुळे शासनयंत्रणा आणि जनता यांमध्ये जो दुरावा निर्माण झाला तो नाहीसा करणे हे लोकशाहीच्या यशस्वितेच्या दृष्टीने अत्यंत अगत्याचे आहे. लोकशाहीत जनतेची भाषा हीच राजभाषा म्हणून सर्वमान्य ठरली तर आजचे सचिवालयीन कारभाराचे केंद्रीभूत स्वरूप नष्ट होऊन ग्रामीण स्तरावरील लोकांमध्ये राज्यकारभाराविषयी आत्मीयतेची व विश्वासाची भावना निर्माण होऊ शकेल. ही जाणीव ठेवूनच शासनाने महाराष्ट्राच्या राज्यकारभारात शक्य तितक्या लौकर मराठीचा वापर करण्याचे आपले धोरण ठरवले व ते कृतीत उतरवण्यासाठी भाषा विभागाची निर्मिती केली.

इंग्रजी भाषेत आजवर रूढ असलेल्या शब्दप्रयोगांसाठी समर्पक, सोपे आणि नेमके पर्याय शोधून वा निर्माण करून एकसंघ अशी शब्दावली तयार करण्याचे काम हे बरेचसे कठीण आहे. त्यासाठी भाषाशास्त्राचा गाढ व्यासंग असलेल्या विद्वानांचे मार्गदर्शन आणि सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. भाषाशास्त्राच्या अभ्यासासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेणाऱ्या विद्वान लोकांची महाराष्ट्रात वाण नाही. त्यांचा दृष्टिकोन साहजिकच स्वतंत्र आणि कोणत्याही राजकीय गैरसमजापासून अलिप्त असतो; आणि म्हणूनच त्यांच्या मार्गदर्शनाखाली

इतका दीर्घकाल टिकलेला परिणाम सहजासहजी नाहीसा होणे शक्य नाही. मराठीकरणाला पोषक असे वातावरण निर्माण होण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांचीच नव्हे तर जनतेचीही मनोभूमिका अनुकूल होणे आवश्यक आहे. ती तयार व्हावी या हेतूने भाषा सल्लागार मंडळाने पहिला टप्पा म्हणून पदनाम कोशाचे काम हाती घेतले. सचिवालयातील आणि इतर सर्व सरकारी कार्यालयांतील अधिकारीवर्ग व कर्मचारीवर्ग यांची इंग्रजी पदनामे गोळा करून त्यांचे मराठी पर्याय ठरवण्याचे काम भाषा सल्लागार मंडळाने नुकतेच संपवले आहे. प्रस्तुत पदनाम कोश हा मला अनेक दृष्टींनी महत्त्वाचा वाटतो. सरकारी कार्यालये व अधिकारी यांचे नामफलक, पत्रव्यवहारातील मायने इत्यादींसाठी प्रस्तुत कोशात दिलेले मराठी पर्याय वापरात आल्यानंतर मराठीच्या व्यवहाराला अनुकूल आणि पोषक असे वातावरण निर्माण होण्यास निश्चित मदत होईल.

प्रस्तुत पदनाम कोशातील पर्याय सूक्ष्म विचार करून आणि संबंधित विभागांशी विचार-विमर्श करूनच तयार करण्यात आलेले आहेत. सर्व सरकारी कार्यालयांतून त्यांचा कटाक्षाने वापर झाल्यास लोकव्यवहारातही ते सहज रूढ होऊ शकतील. यापुढे लौकरच राज्यशासनाचे विकेंद्रीकरण व्हावयाचे आहे. ग्रामीण स्तरावरील प्रशासनासाठी सरकारचे भाषाविषयक धोरण उपकारकच ठरणारे आहे. विकेंद्रीकरणाच्या सुमारासच भाषा विभागाचे हे पहिले प्रकाशन लोकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. जनता त्याचे सहर्ष स्वागत करील असा मला विश्वास वाटतो. भाषा सल्लागार मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी हा पदनाम कोश परिश्रम घेऊन अल्पावधीत पूर्ण केला याबद्दल महाराष्ट्र शासन त्यांचे अत्यंत आभारी आहे.

सचिवालय, मुंबई :<br>
तारीख ५ एप्रिल १९६२<br>
गुढी पाडवा :<br>
चैत्र शुद्ध १, शके १८८४

मुख्य मंत्री

मराठीकरणाचे काम सोपे जाईल या दृष्टीने शासनाने भाषा सल्लागार मंडळाची स्थापना केली. प्रस्तुत मंडळाचे सन्माननीय सभासद पुढीलप्रमाणे आहेत : *

प्रा. कृ. पां. कुलकर्णी, अध्यक्ष
श्री. य. रा. दाते, सदस्य
प्रा. श्री. ना. बनहट्टी, सदस्य
पद्मभूषण डॉ. रा. ना. दांडेकर, सदस्य
डॉ. वि. भि. कोलते, सदस्य
डॉ. ना. गो. कालेलकर, सदस्य
प्रा. गं. बा. सरदार, सदस्य
डॉ. ग. मो. पाटील, सदस्य
श्री. वि. रा. काटे, सदस्य
डॉ. वा. ना. पंडित, सदस्य (सचिव)

प्रशासनविषयक पारिभाषिक शब्दांचे व सरकारी पदनामांचे मराठी पर्याय ठरवण्यासाठी काही मूलभूत तत्त्वांचा अवलंब करणे अपरिहार्य होते. मराठी भाषेची जडणघडण लक्षात घेता काटेकोरपणे केवळ संस्कृताधिष्ठित शब्दांचीच निवड करण्याचे धोरण ठेवता येणार नाही. संस्कृतप्रमाणेच उर्दू, फारशी, कानडी, इंग्रजी अशा विविध भाषांतील कित्येक शब्द मराठीने आत्मसात केले असून ते व्यवहारात प्रचलित आहेत. अशा आणि शिवकालीन व तदनंतरच्या मराठी राजवटीत आणि संस्थानी राज्यव्यवहारात वापरात असलेल्या रूढ शब्दांना डावलून त्याऐवजी नवीन शब्द तयार केल्याने भाषेचा समतोल बिघडून तीत कृत्रिमता निर्माण होण्याची शक्यता आहे. सामान्य माणसाला पेलेल, रुचेल आणि नित्याच्या व्यवहारात सहज रूढ होईल अशीच राज्यकारभाराची भाषा असणे आवश्यक आहे. शास्त्रीय अथवा विधिविषयक परिभाषेच्या बाबतीत मात्र इंग्रजी शब्दप्रयोगांचा संबंधित विषयास अभिप्रेत असलेला अर्थ सुस्पष्ट होईल असे शब्द शोधणे किंवा तयार करणे आवश्यक असते. या सर्व प्रश्नांचा बारकाईने विचार करूनच भाषा सल्लागार मंडळाने प्रशासन शब्दकोशाच्या निर्मितीस प्रारंभ केलेला आहे.

परकीय सत्तेच्या दीडशे वर्षांच्या राजवटीत सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहारावर इंग्रजी भाषेचा किती जबरदस्त पगडा बसलेला आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

---

* भाषा सल्लागार मंडळाच्या रचनेत पुढे बदल झाला. १९७९ साली असलेल्या भा. स. मं. च्या सभासदांची नावे याआधी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेपूर्वी दिली आहेत.